## बीआयटी बार्शीत ‘मेसा’ निमीत्त स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन

येथील जयवंत शिक्षण प्रसारक मंडऴ पुणे या समुहाचे बार्शी येथील भगवंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (बीआयटी) या अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभाग मध्ये सोमवार दिनांक २९ ऑगस्ट २०१६ रोजी “ मेसा- मेकॅनिकल इंजिनीअरिंग स्टुडंट असोशिएशन ” या कार्यक्रामानिमीत्त मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागामध्ये “स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबीराचे” आयोजन केले होते. या मार्गदर्शनासाठी सोलापूर शहरातील श्री उदय शिंदे यांनी विद्यार्थ्यांना बहूमोल असे मार्गदर्शन केले. श्री उदय शिंदे हे स्वतः सोलापूर येथे इन्कम टॅक्स अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

या मार्गदर्शनासाठी बीआयटी महाविद्यालयातील विद्दार्थ्यांनीही मोठ्या संख्येने उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. हा कार्यक्रम यशस्विपणे पार पाडण्यासाठी महविद्दालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अनिल देशमाने, अकॅडेमिक डिन प्रा. डॉ. एन. जी. नार्वे, विभाग प्रमुख प्रा. व्हि. एल. मुंढे, व सर्व प्राध्यापक, कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळाले.